**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
***Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com***
*UGC Approved Sr. No.49366, SEPT-OCT 2017, VOL- 4/36*

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठातील एम.एड्.प्रशिक्षणर्थ्यासाठी ऑनलाईन परीक्षेसाठी विकसित कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

**सुहास पाठक[1], Ph. D. & दादासाहेब पवार[2], Ph. D.**

*[1]साहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद, sspathak2010@gmail.com*

*[2]साहाय्यक प्राध्यापक, ज्ञानज्योती शिक्षणशास्त्र, महाविदयालय सोयगाव जि. औरंगाबाद dadapawar84@gmail.com*

**Abstract**

*21 व्या शतकात उदयाला आलेली जगातील अर्थव्यवस्था तंत्रज्ञान माहीती व ज्ञान यांच्या समन्वयामूळे विकासित झाली आहे. वेगवेगळया प्रकारे माहिती मिळवीणे ,माहितीवर प्रकिया करणे, एकत्रीत करणे, विश्लेषण करणे, ऑनलाईन निकाल अशा विविध गोष्टीसाठी संगणक वापरला जातो. वरिल सर्व बाबीचा शिक्षणातील मूल्यमापनाच्या दुष्टीने विचार करून या वरील उपाययोजन म्हणुन सदरील संशोधन केलेले आहे.*

*संशोधन करण्याच्या प्रमूख पध्दती आहे. सदरील संशोधनात वर्णात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करून माहीती संकलन केले आहे तसेच एम.एड्. प्रशिक्षणार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा घेण्यासाठी ऑनलाईन परीक्षा प्रारूप विकसीत करण्यात आले होते. एम.एड्.प्रशिक्षणार्थांची ऑनलाईन परीक्षा घेण्यासाठी ऑनलाईन परीक्षा प्रारूप विकसित करण्यात आले होते एम एड प्रशिक्षणार्थाची ऑनलाईन परीक्षा घेतल्या नंतर प्रश्नावली या साधनाच्या माध्यमातून माहीती संकलन करून माहीतीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले आहे. प्रश्नावली या साधनातील प्रश्न प्रकाराचा विचार करून बध्द प्रश्नाचा सामावेश करण्यात आला होता. एम.एड्. प्रशिक्षणार्थानी ऑनलाईन परीक्षा दिल्यानतर प्रश्नावली भरून देण्याची व्यवस्था प्रारूपात करण्यात आली होती. सदरील संशोधनास डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठाच्या सर्व नियमीत एम.एड्. शैक्षणिक वर्ष **2014-2015** मधील एकूण **560** विदयार्थी व सेवाअंतर्गत एम एड शैक्षणिक वर्ष **2013-2015** एकूण विदयार्थी असे एकूण **560+200=760** एम एड विदयार्थी एवढी जनसंख्या आहे संशोधनामध्ये एकूण जनसंख्येच्या **30** टक्के नमुना निवडण्यात आला आहे ज्यामध्ये **228** एम.एड्.प्रशिक्षणार्थ्याच्या सामावेश होतो .*

Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com

## प्रस्तावना

राष्टीय मुक्त शिक्षण संस्थामध्ये शैक्षणिक वर्ष **2007 2008** पासुन ऑनलाईन प्रवेश प्रकियेला सुरवात करण्यात आली आहे. प्रथम चरणात **30,000** विदयार्थाचे प्रवेश निश्चित करण्यात आले होते. राष्टीय मुक्त शिक्षण संस्था विदयार्थासाठी आहे विदयार्थासाठी ऑनलाईन प्रवेश करून देणारी भारतातील पहिली शिक्षण

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

संस्था आहे. भारत सरकारने शिक्षणाची जाण आणि प्रचार,प्रसार करण्यासाठी व निरक्षराणा साक्षर करण्यासाठी **1988** मध्ये राष्टीय साक्षरता मिशन सुरू केले आहे. आज भारत सरकारच्या राष्टीय साक्षरता मिशनचे कार्य क्रम वेब अधारीत केले जातात. तसेच या कार्यक्रमाचे स्वतंत्र मॉडेल विकासीत करण्यात आले आहे .या योजनेत राज्याना जिल्हानिहाय ऑनलाईन सुविधा उपलब्ध केलेली आहे. तसेच भारत देशातील घरांचे सर्व क्षण करून त्यातून अध्ययन कर्ते , स्वयसेवक शिक्षक इत्यादीची माहीती संकलीन करून ती अपलोड करण्यासाठी सुविधा वेब अधारीत मॉडलमध्ये आहे .अर्थात राष्टीय साक्षरतेच्या कार्यक्रमात ICT तंत्राचा वापर करण्यात आला आहे

शालेय पातळीपासून ते उच्च शिक्षणापर्यत विदयार्थाच्या गुणाचे मुल्य मापन करण्याचे साधन लेखी परीक्षा आहे लेखी परीक्षेतील दोष दुर करण्यासाठी मुल्यांकनाचे अनेक पर्याय उपलब्ध आहे.

ऑनलाईन परीक्षा पध्दती आज सक्षम पर्याय ठरत आहे मुल्याकनांत ऑनलाईन प्रीाक्षा उपयोगात आणल्यास अनेक फायदे शिक्षण पध्दतीला मिळतील .

## ऑनलाईन परीक्षा पध्दतीचे शिक्षणातील फायदे

**1** वेळेची बचत **2** अचूकता **3** तात्काळ प्रत्यभरण **4** लवचिकता **5** निर्णय शक्तीत वाढ **6** सातत्याने सुधारणा **7**अध्यावत माहीती

ऑनलाईन परीक्षा पध्दतीचे नियोजन बध्द प्रारूप विकसीत केले तर येणाया काळामध्ये शिक्षणपध्दतीत मुल्याकनाला एक चांगला पर्याय उपलब्ध होईल यासाठी सदरील समस्येचे उपयोजन म्हणून संशोधन करण्यात आले आहे.

## संशोधनाची गृहीतके

**1** प्रचलित शिक्षणपध्दतीत एम.एड्.विदयार्थाचे मुल्याकन लेखी परिक्षा पध्दतीने केली जाते.

**2** प्रचलित एम.एड्.परीक्षा पध्दतीतअनेक दोष आहे .

**3** प्राथमिक स्तरापासुन उच्च शिक्षण स्तरापर्यत लेखी परिक्षा पध्दती वापरली जाते.

## संशोधनाची उदिष्टे

**1** डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठाच्या एम.एड्.अभ्यासकंमाचा अभ्यास करणे.

**2** डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठाच्या एम.एड्.अभ्यासकंमातील परिक्षासाठीच्या पॅटर्न मधील प्रश्न पध्दतीचा अभ्यास करणे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

3 डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठाच्या एम.एड्.प्रशिक्षणार्थाच्या परिक्षेसाठी ऑनलाईन परिक्षा पध्दतीने प्रारूप विकसित करणे.

## संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

सदरील संशोधनात डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठातील एम.एड्.च्या अभ्यासक्रमाचा सामावेश करून **2012** ते **2015** या कालावधीत संशोधन कार्य पूर्ण केले आहे. तसेच एम.एड्.प्रशिक्षणार्थ्याच्या ऑनलाईन परिक्षा पध्दतीच्या प्रारूपव्दारे ऑनलाईन परीक्षा घेवून तथ्य संकलित केले आहे .

## संशोधन पध्दती

संशोधन करण्याच्या प्रमूख तीन पध्दती आहे.सदरील संशोधनात वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला आहे.

## संशोधनाची साधने

संशोधनाची विविध साधने आहे प्रस्तूत संशोधनात प्रश्नावली व ऑनलाईन प्ररिक्षेसाठी विकसित कार्यक्रम प्रारूप या साधनाचा उपयोग करून एम.एड्.प्रशिक्षाणार्थ्याची ऑनलाईन परिक्षा घेवून प्रश्नावलीच्या माध्यमातुन माहीती संकलित करून विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे .

## संशोधनाची नमुना निवड

सदरील संशोधनात असंभाव्यता नमुना निवड प्रकारातील प्रांसगिक नमूना निवड पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे ज्यामध्ये एकूण जनसंख्येच्या **30%**नमुना निवडण्यात आला आहे.

## संशोधनाचे निष्कर्ष

1 विकसित केलेल्या ऑनलाईन परिक्षा प्रारूपाामधून प्राप्त झालेलया **100%** एम.एड्.प्रशिक्षणार्थी समाधानी आहे.

2 एम.एड्. प्रशिक्षणार्थ्याना ऑनलाईन परीक्षा देताना जिज्ञासा व नाविन्यता वाटली.

3 ऑनलाईन परिक्षा प्रारूपातील प्रश्नामध्ये असणारा कम भिन्न असल्यामूळे **100%** एम.एड्.प्रशिक्षणार्थी परीक्षेत कॉपी करू शकले नाही .

4 चुकलेल्या प्रश्नाची अचूक उत्तरे शोधण्याची सुविधा ऑनलाईन परीक्षा प्रारूपात असल्यामुळे नेमके काय चुकले व त्याचे योग्य उत्तरे कोणती हे विदयार्थाना समजल्याने त्यांच्या ज्ञानात भर पडली.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

5 ऑनलाईन परिक्षा दिल्यामूळे वेळेची बचत, तंत्रशिक्षणातुन शिक्षण ,अदयावत ज्ञान इत्यादी फायदे होतात असे 100% एम.एड्.प्रशिक्षाणार्थाना वाटते.

6 NET, SET, M.P.S.C .U.P.S.C या स्पर्धा परिक्षेची तयारी करण्यासाठी 90% एम.एड्. प्रशिक्षणार्थास ऑनलाईन परिक्षा सोपी व उपयुक्त वाटते.

7 एम.एड्. च्या लेखी परिक्षेतील ऊणीवा ऑनलाईन परीक्षा पध्दतीने कमी करता येतील असे 80 % एम.एड्. प्रशिक्षणार्थास वाटते.

8 विदयार्थाची निर्णय शक्ती वृध्दीगत करण्यासाठी ऑनलाईन परीक्षा पध्दती उपयुक्त ठरते असे 100% एम.एड्.प्रशिक्षणार्थास वाटते.

**संदर्भग्रंथसुची**

*नाकतोडे डॉ किरण (**1997**) ) शालेय व्यवस्थापन सरंचना आणि अधुनिक प्रवाह*

*विदया प्रकाशन नागपूर.*

***रा. रा. मुळे व वि तु उमाटे (1998)***

*शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे ,नागपुर, साहित्य प्रचार केंद्र.*

*अकोलकर गा. वि.व पाटणकर ना. व.(**2005**) शालेय व्यवस्था आणि प्रशासन निळकंट प्रकाशन पुणे.*

*www.shodhganga.infilbnet.ac.in.*

***डॉ भिंताडे वि.रा. (2007)** शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे, नुतन प्रकाशन*

***जोशी शोभना** आणि शिराढोणकर मेघना (**2007**) माहीती संप्रेषण तंत्रज्ञान,*

*औरंगाबाद ,मृण्ययी प्रकाशन.*